एम.एच.एल.सी.२८००००९७२०२५

**निशाणी ओ—**

दाखल दिनांक : १९/०८/२०२५
नोंदणी दिनांक : १९/०८/२०२५
निकाल दिनांक : ०६/०३/२०२६
कालावधी : ०० वर्ष ०६ म. १७ दि.

**कामगार न्यायालय, बुलढाणा.**
**(श्री.शार्दुल श.जहागिरदार, नियंत्रक अधिकारी तथा न्यायाधीश)**

**अर्ज (उपदान) क्रं. ३१/२०२५**

**रमेश रामराव देशमुख,**
चालक, बिल्ला न. १५९६७,
वय—६३ वर्षे, धंदा—सेवानिवृत्त,
रा. मु.पो. सवडद, ता. सिंदखेड राजा,
जि. बुलढाणा, ह.मु. टिळक नगर, वार्ड नं. ५,
मेहकर, ता. मेहकर, जि. बुलढाणा. .. **अर्जदार**

**—विरुध्द—**

**मा. विभाग नियंत्रक,**
महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ,
विभागिय कार्यालय मलकापुर रोड,
बुलढाणा, ता. जि. बुलढाणा. .. **प्रतिवादी**

**दावा :— अर्ज (उपदान कायदा अंतर्गत) उर्वरित उपदान रक्कम रुपये २४,५२१/— मिळणेकरीता.**

**विधिज्ञ :—** श्री. बि. सी. वानखडे, अर्जदाराकरीता.
श्री. एस. एल. राखोंडे, प्रतिवादींकरीता.

**<u>निकालपत्र</u>**

(पारीत दिनांक ०६/०३/२०२६)

**१)** प्रस्तुतचा उपदानाचा अर्ज अर्जदार रमेश रामराव देशमुख हयांनी दाखल केला असून असे प्रतिपादन केले आहे की, या प्रकरणातील प्रतिवादी म्हणजे विभाग नियंत्रक, महाराष्ट्र परिवहन महामंडळ, बुलढाणा यांच्याकडे दि. ०५/११/१९८८ रोजी रोजंदारीवर चालक म्हणून रूजू झाले आणि दि. ३१/०७/२०२० रोजी अर्जदार सेवानिवृत्त झाले. अर्जदार असे पुढे म्हणतात की, त्यांनी प्रतिवादींकडे वाहक म्हणून दि. ०५/११/१९८८ ते ३१/०७/२०२० पर्यंत ३१ वर्षे ०८ महिना व २६ दिवस एवढी प्रदिर्घ आणि सलग सेवा केलेली आहे.

**२)** अर्जदार पुढे असे म्हणतात की, सेवानिवृत्तीच्या काळात त्यांचे मुळ वेतन रू. ३७,९००/— आणि महागाई भत्ता रू. ४५४८/— असे मिळून एकुण वेतन रू. ४२,४४८/— एवढे होणे आवश्यक होते आणि त्या अनुषंगाने अर्जदाराची सेवा विचारात घेवून उपदानाची फक्त रक्कम फक्त रू. ७,५९,१५९/— एवढीच दिली परंतु ती रु. ७,८३,६८०/— एवढी देणे गरजेचे होते व उर्वरित उपदान रक्कम रू. २४,५२१/— दिली नाही. त्यामुळे प्रतिवादींकडे त्या अनुषंगाने अर्जदारांनी सातत्याने मागणी केली परंतु, आजपर्यंत ती रक्कम प्रदानच करण्यात आली नाही.

**३)** अर्जदार पुढे असे म्हणतात की, प्रतिवादींना उपदाना करीता फॉर्म—आय हा सुध्दा देण्यात आला परंतु, त्याचा काहीही उपयोग झाला नाही आणि त्यामुळेच प्रतिवादींना असे निर्देशीत करण्यात यावे की, त्यांनी अर्जदारांना रू. २४,५२१/— आणि त्यावर १० टक्के व्याज प्रदान

करावे आणि अर्जदारांचा हा अर्ज मंजूर करण्यात यावा अशी प्रार्थना करतात.

**४)** प्रतिवादींनी आपली लेखी कैफियत नि. क्रं. सी—३ खाली दाखल केलेली असून, असे कथन केले आहे की, या प्रकरणात अर्जदारांनी उपदान रकमेची जी मागणी केली आहे, ती खोटी असून हा अर्ज पुर्णपणे फेटाळण्यास पात्र ठरतो. प्रतिवादी पुढे असे म्हणतात की, अर्जदार हे प्रतिवादी यांचेकडे चालक म्हणून दि. ११/०१/१९८९ रोजी रूजू झाले आणि दि. ३१/०७/२०२० रोजी सेवानिवृत्त झाले त्यामुळे अर्जदाराची एकुण सेवा ही ३१ वर्षे झाली आहे. अर्जदारांना नियमानुसार योग्य ती उपदानाची रक्कम देण्यात आलेली आहे, त्यामुळे आता अर्जदार कोणतीही रक्कम मिळण्यास पात्र ठरत नाहीत. अर्जदाराने चुकीचे गृहीतक मांडून या न्यायालयात उपदान मिळण्याकरीता जो अर्ज केला आहे, तो चुकीचा आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज पुर्णपणे बेकायदेशिर ठरत असल्यामुळे खर्चासह फेटाळण्यास पात्र ठरतो.

**५)** प्रतिवादी पुढे असे म्हणतात की, अर्जदारांना नियमानुसार योग्य ती उपदानाची रक्कम देण्यात आलेली असून त्यांनी चुकीचे गृहीतक मांडून या न्यायालयात उपदान मिळण्याकरीता जो अर्ज केला आहे, तो चुकीचा आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज पुर्णपणे बेकायदेशिर ठरत असल्यामुळे खर्चासह फेटाळण्यास पात्र ठरतो.

**६)** प्रतिवादी पुढे असे म्हणतात की, ज्यावेळी अर्जदारांना उपदानाची रक्कम देण्यात आली, त्यावेळेला प्रस्तुतची रक्कम ही कमी आहे याबाबत कुठलीही लेखी अथवा तोंडी हरकत अर्जदारांनी घेतली

नाही आणि देण्यात आलेली उपदानाची रक्कम बरोबर आहे, याची माहिती अर्जदाराला असल्यामुळे त्याबाबत त्यांनी तक्रार केली नाही आणि त्यामुळे हा अर्ज चुकीचा ठरतो आणि प्रतपालनीय नाही. प्रतिवादी पुढे असे म्हणतात की, अर्जदारांना उपदान रक्कम देतांना ती कशाप्रकारे आणि किती वर्षाची काढली याची संपुर्ण माहिती देण्यात आली होती आणि यावर त्यांनी कोणतीही हरकत घेतली नव्हती. त्यामुळे, आता हरकत घेवून त्यांना हा अर्ज दाखल करण्याचा कायदेशीर अधिकार नसल्यामुळे प्रस्तुतचा अर्ज पुर्णपणे फेटाळण्यास पात्र ठरतो.

**७)** प्रस्तूत प्रकरणात निशाणी क्रं.ओ–३ वर खालील मूद्दे निश्चीत करण्यात आलेले आहेत, त्यावर माझे निष्कर्ष खालील कारणांसाठी म्हणून देत आहे –

| **अ. क्र.** | **मुद्दा** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | अर्जदार हे सिध्द करतात का, कि त्यांनी मागितलेल्या दादसाठी ते पात्र आहेत ? | होकारार्थी. |
| २) | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दा क्रं. १ करीता</u>** :–

**८)** मुद्दा क्रं. १ चे अवलोकन करतांना हे स्पष्ट होते कि, अर्जदारांनी उपदानाची रक्कम रुपये २४,५२१/– आणि त्यावर १० टक्के व्याज मिळण्याकरिता म्हणून हा अर्ज दाखल केलेला आहे, त्यावर

प्रतिवादी हयांचे कथन आणि तोंडी युक्तीवाद असा आहे कि, मुळातच अर्जदारांना उपदान संदर्भातील सर्व रक्कम ही पुर्णपणे देण्यात आलेली असल्यामुळे आता कोणतीही रक्कम प्रतिवादी देण्यास बांधील ठरत नाहीत.

**९)** अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज उपदान मिळण्याकरीता म्हणून प्रतिवादींविरूध्द दाखल केलेला आहे आणि या प्रकरणात अर्जदार आणि प्रतिवादी यांच्यामध्ये कामगार—मालक या नात्यावरून कोणताही संघर्ष नाही, उलटपक्षी प्रतिवादींना हे मान्य आहे की, अर्जदारांनी त्यांच्याकडे वाहक म्हणून सेवा बजावलेली आहे. अर्जदारांचे कथन असे आहे की, प्रतिवादींकडे चालक म्हणून जवळपास ३२ वर्षे सेवा बजावलेली असल्यामुळे अर्जदार संपुर्ण उपदानाची रक्कम मिळण्यास पात्र ठरतात, तर प्रतिवादींचे त्यावर कथन असे आहे की, अर्जदार हे गैरअर्जदार महामंडळाकडे दि. ११/०९/१९८९ रोजी लागलेले होते व दि. ३१/०७/२०२० रोजी सेवानिवृत्त होवुन त्यांची उपदान पात्र सेवा ३१ वर्षे होते व त्यांनी केलेल्या सेवेची संपुर्ण उपदानाची रक्कम त्यांना दिलेली आहे. त्यामुळे हे स्पष्ट होते की, अर्जदार आणि प्रतिवादी ह्यांच्यामध्ये सेवेचा कार्यकाळ आणि त्या अनुषंगाने तयार होणारी उपदान रक्कम या मुद्दयापुरतेच मर्यादीत आहे आणि त्यामुळे अर्जदार आणि प्रतिवादी ह्यांनी या प्रकरणात दाखल केलेल्या पुराव्याचा स्वतंत्रपणे परामर्श घेणे आवश्यक ठरते.

<u>अर्जदारांचा पुरावा</u>

**१) निशाणी क्रं.यु—७ खाली सेवापुस्तीकेची प्रत.**

**२) निशाणी क्रं.यु—८ खाली सेवानिवृत्तीचा आदेश**

**३) निशाणी क्रं.यु—९ उपदान तक्ता**

**४) निशाणी क्रं.यु—१० शेवटचे पगार पत्रक**

**५) निशाणी क्रं.यु—११ फॉर्म—आय नोटीस**

**१०)** मुळातच, अर्जदार आणि प्रतिवादी ह्यांच्यामध्ये नेमणुक दिनांकासंदर्भात वाद आहेत. त्या अनुषंगाने अर्जदारांचा असा युक्तिवाद आहे की, नि. क्र. यु—७ खाली अर्जदारांनी सेवापुस्तीकेची प्रत दाखल केलेली आहे ज्याचे बारकाईने आणि सुक्ष्म पध्दतीने अवलोकन केल्यानंतर हे स्पष्ट होते की, या सेवापुस्तीकेच्या पान क्र. ४ वर उजव्या बाजुस रोजंदार तारीख ०५/११/१९८८ अशी स्पष्टपणे नमुद केलेली आहे. त्यानंतर सेवापुस्तीकेच्या पान क्र. ५ वर दि. २९/०६/१९८८ रोजी अर्जदारांची वैद्यकीय तपासणी जिल्हा सामान्य रुग्णालय बुलढाणा येथे करण्यात आली असे नमुद आहे. यामुळे हे स्पष्ट होते की, प्रतिवादींच्या या युक्तीवादामध्ये कोणतेही गुण आणि तथ्य आढळत नाही की, अर्जदारांची सेवा ही ३१ वर्षांचीच झालेली आहे.

**११)** अर्जदार आपल्या तोंडी युक्तीवादामधुन हे सप्रमाण सिध्द करतात की, मुळातच प्रस्तुतचे निशाणी क्र. यु—७ खालील सेवापुस्तक जे अर्जदारांनी दाखल केलेले आहे त्याची मुळ प्रत ही प्रतिवादींच्याच ताब्यात आहे आणि अर्जदार पुढे असेही नमुद करतात की, प्रतिवादींच्या या युक्तीवादात कोणतेही तथ्य आढळुन येत नाही की, प्रस्तुतचे सेवापुस्तक हे सत्य प्रतीमध्ये नाही त्यामुळे पुराव्याच्या दृष्टीकोनातुन ते गौण ठरते, अर्जदार पुढे असे म्हणतात की, सेवापुस्तक हे प्रतिवादींच्याच महामंडळाने निर्गमीत केलेले असल्यामुळे त्यावर महामंडळाचा शिक्का हा प्रत्येक पानावर नमुद केलेला आहे. त्याचप्रमाणे सेवापुस्तकाच्या ज्या ज्या पानावर नोंदी आहेत त्या त्या पानांवर विभाग

नियंत्रक राज्य परिवहन महामंडळ बुलढाणा हयांच्या सहया व शिक्के आहेत.

**१२)** अर्जदारांच्या उपरोक्त युक्तीवादाच्या अनुषंगाने अभिलेखावर दाखल केलेले सेवापुस्तकाचे बारकाईने आणि सुक्ष्म पध्दतीने अवलोकन केल्यानंतर हे स्पष्ट होते की, प्रतिवादी महामंडळाच्या या युक्तीवादामध्ये कोणतेही तथ्य आढळत नाही की, हे सेवापुस्तक पुराव्याच्या दृष्टीकोनातुन गौण ठरते. त्याचे दोन कारणे आहेत, **१) प्रतिवादी अभिलेखावर असा कोणताही आणि सक्षम कागदोपत्री पुरावा दाखल करीत नाहीत की ज्यामुळे हे सिध्द होईल की अर्जदारांचे मुळ सेवापुस्तक व त्यातील नोंदी आणि अभिलेखावर नि.यु—७ खाली दाखल असलेले सेवापुस्तक प्रत व त्यातील नोंदी पुर्णपणे वेगवेगळया आहेत, २) प्रतिवादी महामंडळ अभिलेखावर असा कोणताही पुरावा दाखल करीत नाहीत की ज्याने हे स्पष्ट होईल की, अर्जदारांनी त्यांच्या नि.क्र. यु—७ खालील सेवापुस्तकामध्ये बनावट व खोटया नोंदी नमुद केलेल्या आहेत आणि अर्जदाराने खोटा व बनावट पुरावा दाखल केलेला आहे.**

**१३)** मुळातच अर्जदारांची नेमणुक ही अर्जदार नमुद करतात त्यावेळी म्हणजेच दि. ०५/११/१९८८ रोजी झाली हे अर्जदारांनी अभिलेखावर दाखल केलेल्या सर्व कागगोदपत्री पुराव्यामधुन पुर्णपणे सिध्द केल्यामुळे हे स्पष्ट होते की, अर्जदार हे त्यांनी मागितलेल्या दादसाठी पुर्णपणे पात्र ठरतात. त्यामुळे अर्जदार हे उपदान रक्कम रु. २४,५२१/— आणि त्यावर नियमाप्रमाणे आणि कायदयाप्रमाणे अनुज्ञेय असणारे १० टक्के व्याज मिळण्याकरीता पात्र ठरतात. करीता मुद्दा क्रं. १ होकारार्थी

ठरतो व खालील आदेशान्वये प्रस्तुतचा अर्ज निकाली काढण्यात येत आहे :—

## <u>आदेश</u>

(१) अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

(२) अर्जदार हे उर्वरित उपदान रक्कम रुपये २४,५२१/— आणि त्यावर १० टक्के व्याज त्यांची सेवानिवृत्ती दिनांक ३१/०७/२०२० पासून प्रत्यक्ष रक्कम मिळेपर्यंत, प्रतिवादी ह्यांच्याकडून मिळण्यास पात्र ठरतात.

(३) कार्यालयास असे निर्देशित करण्यात येत आहे की, उपदान प्रदान महाराष्ट्र नियम, १९७२ अन्वये प्रतिवादी यांना नमुना ‘आर’ अन्वये नोटीस पाठवावी.

(४) सर्व पक्षांनी आप—आपला खर्च सोसावा.

(५) प्रकरणाची नस्ती बंद करण्यात येत आहे.

SHARDUL SHASHIKANT JAHAGIRDAR

Digitally signed by SHARDUL SHASHIKANT JAHAGIRDAR
Date: 2026.03.09 11:26:16 +0530

**दिनांक :— ०६/०३/२०२६** **(शार्दुल श. जहागिरदार)**
**न्यायाधीश,**
**ठिकाण :— बुलढाणा.** **कामगार न्यायालय, बुलढाणा.**

युक्तीवाद ऐकल्याचा दिनांक :— ०६/०३/२०२६
श्रुतलेखन दिल्याचा दिनांक :— ०६/०३/२०२६
टंकलिखीत केल्याचा दिनांक :— ०६/०३/२०२६
निकालपत्र तपासणी आणि स्वाक्षरी दि. :— ०६/०३/२०२६